# महाराष्ट्र राज्य विद्युत् पारेषण कं.लि.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

टेलि.नं.(का.) ०२२-२६५९ ८५९५
(वै.) ०२२-२६५९ ०८०८
फॅक्स क्र. ०२२-२६५९ ००८८
ई-मेल ceoandm@mahatransco.in

पारेषण विभाग, 'प्रकाशगंगा''
म.रा.वि.पा.कं.लि
प्लॉट क्र.सी-१९, ई-ब्लॉक,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा
(पू.)
मुंबई - ४०० ०५१.

संदर्भ क्र.मराविपाकंलि/सां.का./मुअ/संवसु/फा.क्र./ दिनांकः

**पर्यावरणाचा आणि सामाजिक आढावा**

हा पर्यावरण आणि सामाजिक आढावा, इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन (IFO) या संस्थेच्या संचालक मंडळाच्या प्रस्तावित व्यवहारावर विचार करण्यापूर्वी तयार करुन वितरीत करण्यात येत आहे. आयएफसीच्या कार्याची पारदर्शकता अधिक मोठया प्रमाणात स्पष्ट व्हावी हा यामागील हेतू आहे. मात्र हे कागदपत्र म्हणजे संचालक मंडळाच्या निर्णयाचा परिणाम गृहीत धरुन तयार केले आहेत असा अन्वयार्थ लावण्यात येऊ नये. मंडळाची आकडेवारी हे केवळ अंदाज आहेत. या पर्यावरण व सामाजिक सारांशाला जोडलेले कोणतेही कागदपत्र प्रकल्प प्रायोजकांनी तयार केलेले आहे व सार्वजनिक वितरणासाठी त्याला अधिकृतता प्रदान करण्यात आली आहे. आय्एफसीने या कागदपत्रांचे अवलोकन केले आहे. ही कागदपत्रे सार्वजनिक वितरणासाठी पुरेशी दर्जेदार आहेत असे मत दिले आहे. मात्र यातील माहितीला पुष्टी दिलेली नाही.

प्रकल्प ओळख

| देश<br>भारत | प्रकल्पाचे नांव<br>म.रा.वि.पा.कं.लि. | प्रकल्प क्र.<br>२७५१९ |
|---|---|---|
| प्रदेश<br>आशिया | | पर्यावरण श्रेणी<br>बी . लिमिटेड |
| विभाग/तुकडी<br>सीएस्एफडीआर-सब-राष्ट्रीय<br>वित्त कार्यालय<br>सीएसएफ संचालकांचे कार्यालय | कंपनीचे नांव<br>महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी<br>मर्यादित | |
| प्रकल्प बिझनेस सेन्टरः सीए-एफ-ट्रान्समिशन | | प्रकल्पाची स्थिती- कार्यरत |

पालक प्रकल्प ओळख

| | |
|---|---|
| पालक आयडी | |
| पालकाचे लघू नांव | |
| पालकाशी नातेसंबंध | नातेसंबध नाही |

आयएफसीच्या प्रकटनाच्या गरजाः

| | |
|---|---|
| इएमआर इन्फोशोपला पाठविल्याचा व आयएफसी बेबसाईटची दि. | |
| पुनर्रक्षणाचा दि. (जर योग्य असल्यास) | |
| वस्तूस्थितीच्या अचूकतेसाठी अशीलाने दिल्याचा दिनांक | |
| स्थानिक प्रकटनाचा दिनांक | |
| सुधारित सा.प.आ.सू.व्य. प्रणालीच्या स्थानिक प्रकटनाचा दिनांक | |

## आढावाबाबत आयएफसीची व्याप्ती

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने पाच वर्षाच्या गुंतवणूक आराखडयाचा भाग म्हणून विकसीत करावयाच्या व प्राधान्य द्यावयाच्या प्रकल्पांची सर्वकष यादी केलेली आहे. या प्रकल्पांमध्ये नवीन उपकेंद्रे, नवीन पारेषण वाहिन्या/तारमार्ग सध्या भारतातील महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेली उपकेंद्रे आणि पारेषण तारमार्ग यांची क्षमता वाढविणे यांचा समावेश आहे. महापारेषण कंपनीने आपल्या विद्युत पारेषणाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणांच्या कार्यक्रमाला सहाय्य व्हावे यासाठी आयएफसी या संस्थेकडे कंपनी कर्ज (Corporate Deptt.) मिळण्यासाठी संपर्क साधला.

आयएफसीच्या प्रस्तावित गुंतवणूकीसाठी देण्यात आलेल्या या आढाव्यात खालील बाबींची माहितीचा समावेश आहे. महापारेषणने सादर केलेली तांत्रिक, पर्यावरणाबाबतची आणि सामाजिक बार्बीची माहिती यामध्ये महापारेषण कंपनीच्या गुंतवणूक आराखडा, प्रकल्पाशी संबंधीत असलेल्या प्रमाणीत कार्यपध्दती, संचालन अणि सुव्यवस्था (देखभाल), पीके आणि वृक्ष यांची भरपाई, प्रकल्पांच्या कराराची कागदपत्रे, कर्मचारी वर्ग आणि मानव संसाधनाशी संबंधीत कंपनीची परिपत्रके, आदेश आणि म.रा.वि. मंडळाची कर्मचारी वर्गाची सेवा नियमावली. या मूल्यांकन पथकाने महापारेषण कंपनीच्या मुख्यालयातील आणि प्रत्यक्ष कार्यपालन करणा-या व्यावसायिकांच्या मुलाखती घेतल्या तसेच मूल्यांकनासाठी भारताच्या महाराष्ट्र राज्यातल्या नागपूर शहराच्या आसपास असलेल्या कंपनीच्या कार्यरत प्रकल्पांनाही भेटी दिल्या.

प्रकल्पाचे संभाव्य पर्यावरण, आरोग्य, सुरक्षा आणि सामाजिक पैलू यांचे विश्लेषण करण्यात आले. पर्यावरण आणि सामाजिक मूल्यांकन, कंपनीतील पर्यावरण, सामाजिक आरोग्य आणि सुरक्षा प्रणालीचे मूल्यांकन, जनसमुदायाशी सल्लामसलत व समुपदेशन जाहीर प्रगटन आणि करारपत्रे, श्रमशक्ती आणि कामे करण्याची पध्दती, यातच कर्मचा-यांच्या व्यवसायिक आरोग्य आणि सुरक्षा यांचे व्यवस्थापन प्रदुषणाला आळा घालणे तसेच ते कमी करणे (संसाधनाचे व्यवस्थापन - यात उर्जा, पाणी, धोकादायक आणि अन्य साहित्य आणि सामग्री, उत्सर्जनाचे व्यवस्थापन बाहेर टाकल्या जाणा-या धोकादायक व इतर निरुपयोगी पदार्थांचे व्यवस्थापन यांचा समावेश होतो), सामुदायिक पर्यावरणाचे व्यवस्थापन, उभारणी, रचना व कार्य चालतांना निर्माण होणारे आरोग्य आणि सुरक्षा विषयक प्रश्न आणि प्रकल्पाच्या संदर्भातील मार्गाचा हक्क (Right of Way Row) यांचे व्यवस्थापन.

## प्रकल्प वर्णन

महापारेषण कंपनी ही विजेचे पारेषण करणारी सेवासंस्था असून तिची १०० टक्के मालकी महाराष्ट्र शासनाची आहे. पूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ही एक खांबी एकात्म स्वरुपाची संस्था २००५ मध्ये तीन वेगवेगळया कंपन्यामध्ये विभागली गेली. विजेचे पारेषण, वितरण आणि निर्मिती या साठी या तीन सवतंत्र कंपन्या आहेत. महापारेषण कंपनीचे राज्यव्यापी वीज पारेषणाचे नेटवर्क (जाळे) देशात सर्वात मोठे आहे. महापारेषणच्या पारेषण तारमार्गाची लांबी ३६,२८६ सर्कीट कि.मी. पेक्षा जास्त असून ४९८ वीज उपकेंद्रे आहेत. या नेटवर्क मध्ये व्होल्टेज क्षमता ५०० के.व्ही. पासून ६६ के.व्ही. पर्यंत आहे. महापारेषण कंपनीच्या प्रणालीची उपलब्धता ९८.९% आहे आणि पारेषण हानी ४.६७% अशी आहे. नव्या वीज निर्मिती केंद्रातून भविष्यात येणारी वीज पारेषण करण्यासाठी महापारेषण कंपनीस क्षमता वाढवायची आहे. तसेच सध्याची अस्तित्वातील यंत्रणेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी महापारेषण कंपनीस मोठया प्रमाणात भांडवली गुंतवणूकीची आवश्यकता आहे. म्हणून महापारेषण कंपनीने ५ वर्षाचा भांडवली खर्चाचा कार्यक्रम ('प्रकल्प") तयार केला आहे. त्यात पुढील कामावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. (अ) सध्याच्या नेटवर्कचे पूनर्वसन करुन त्याची कार्यक्षमता

अधिक उच्च दर्जाची करणे व ती कायम ठेवणे (ब) राज्यातील नवीन वीज निर्मिती क्षमतेसाठी वीज निर्वासनाच्या वाहिन्या उभारणे. महापारेषण कंपनी पंचवार्षिक भांडवली खर्चाच्या कार्यक्रमासाठी भागशः वित्त पुरविण्यासाठी तिला कॉर्पोरेट कर्ज पुरविण्याबाबत आय्एफसी विचार करीत आहे.

**कार्यपालनाची प्रमाण्के लागू करणे**

आय्एफसी ने पर्यावरण आणि सामाजिक संचात केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे की, या गुंतवणकीमुळे जे परिणाम (आघात) होतील त्याचे व्यवस्थापन खालील कार्यपालनाच्या प्रमाणकांशी सुसंगत अशा पध्दतीने केलेच पाहिजे.

| | |
|---|---|
| पी.एस.१ (Performance Standard 1) | सामाजिक आणि पर्यावरणाच्या मूल्यमापन आणि व्यवस्थापनाची (कार्यपालन प्रमाणक क्र.१) प्रणाली |
| पी.एस.२ | श्रम व कामाबाबत स्थिती |

महापारेषण या कंपनीचे का.प्र.आ.सु. (सामाजिक, पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा) याबाबतचे धोरण आय्एफसी च्या कार्यपालनाच्या प्रमाणकांशी सुसंगत आहे. तसेच या कंपनीची सामाजिक, पर्यावरणाची, आरोग्य आणि सुरक्षा यांच्या व्यवस्थापनाची प्रणाली (या दोन्हीचा उल्लेख यापुढे स.व.प. धोरण व पध्दती असा किंवा सा.व.प. असा संक्षेपाने करण्यात आला आहे). यामध्ये आय्एफसी ची कार्यपालनाच्या प्रमाणकांची तरतूद, कार्यपालन प्रमाणक-३ आणि ८ सह समाविष्ट करण्यांत आली आहे.

**प्रकल्पाची श्रेणी ठरविणे**

या प्रकल्पाशी जे सामाजिक व पर्यावरणीय घटक निगडीत आहेत, त्याचा संबंध महापारेषण कंपनीच्या सामाजिक आणि पर्यावरणाच्या मूल्य मापनाशी तसेच त्यासाठीच्या व्यवस्थापन प्रणालीशी आहे. या प्रकल्पाच्या संदर्भात ज्या प्रमुख सामाजिक व पर्यावरणीय प्रश्नांवर व्यवस्थापन प्रणालीद्वारे लक्ष द्यावे लागणार आहे ते असे – मार्गाचा हक्क (Row) यावर येणारे प्रस्तावित निर्बंध/मर्यादांमुळे कौटुंबिक जीवनावर होणारे आघात, बांधकाम/उभारणी करतांना व देखभालीसाठी करावी लागणारी वृक्षतोड आणि पिकांची नासाडी, बांधकाम, उभारणी करतांना व नंतर कामकाज चालवितांना कर्मचारी तसेच स्थानिक लोकसमुह यांच्या आरोग्य व सुरक्षेवर होणारे अनिष्ट परिणाम, लोकसमुहांशी सल्ला मसलत करणे व त्यांच्याशी संबंध जोडणे, कामगारांच्या कामाच्या जागेचे वातावरण, स्थिती, यामध्ये कंपनी कामगार तसेच कंत्राटी मजूर यांच्या आरोग्याचे व सुरक्षेच्या समस्या, उत्सर्जनामुळे, जमिन (माती),

पाणी यांच्यावर होणारे परिणाम तसेच जैविक विविधतेवर आणि सांस्कृतिक जीवनावर होणारे संभाव्य परिणाम हे सर्व परिणाम अल्पकालीन असून प्रकल्पाच्या जागेपुरते मर्यादित असतील. मात्र पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील क्षमतेच्या क्षेत्रात काही टाळता येणार नाहीत असे परिणाम होऊ शकतील. हे परिणामही परतून लावता येतील आणि त्याचा प्रभाव मर्यादितच असेल याशिवाय असे प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी अभियंत्रिकी आणि व्यवस्थापकीय उपाय तात्काळ अंमलात आणता येतील यामुळे या प्रकल्पाचे वर्गीकरण – श्रेणी 'ब'' मध्ये (Category B) करण्यांत येते.

## पर्यावरण व सामाजिक प्रश्नांचे स्वरुप व ते शमन करण्याचे उपाय

कंपनीने या परिणामाबाबत काय उपाय योजना येतील याचा आराखडा सादर केला आहे. प्रस्तावित प्रकल्पाच्या बाबतीत संमत केलेल्या निश्चित उपाय योजना अंमलात आणल्या जातील आणि पर्यावरणाच्या आणि सामाजिक गरजांची पूर्तता केली जाईल, तसेच यजमान देशाच्या कायदे आणि विनियम, आय्एफसीची कार्यपालनाची प्रमाणके, जागतीक बँक/आय्एफसी यांची पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा याविषयीच्या मार्गदर्शनपर सूचना या सर्वांची अंमलबजावणी केली जाईल. या संभाव्य परिणामांवर कंपनी/प्रकल्प काय उपाय योजना करील याची माहिती खालील परिच्छेदात सारांशाने दिली आहे.

## कार्यपालनाचे प्रमाणक क्र.१ (पीएस १): सामाजिक व पर्यावरणाचे मुल्यांकन व व्यवस्थापन प्रणाली:

महापारेषण कंपनीचे व्यवस्थापन, कंपनीचे प्रकल्प आणि कार्य (Projects & Operation) या संबंधात उद्भवणा-या सामाजिक, पर्यावरणाच्या, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षेच्या (SEMS) समस्यांना तोंड देण्यास बांधिल आहे. कंपनीने 'आय्एसओ ९००१:२०००'' हे मानांकन संपादन करुन आपली व्यवस्थापन प्रणाली दर्जेदार असल्याचे दाखवून दिले आहे. मात्र जरी पारेषण कंपनी सामाजिक, पर्यावरण, आरोग्य व सुरक्षेच्या क्षेत्रातील संबंधीत समस्यांशी यशस्वीरित्या सामना करीत असली, तरी त्यांचे व्यवस्थापन एका विशिष्ट प्रकारची रचना असलेल्या आणि कागदोपत्री नोंदलेल्या सा.प.आ.सु. (SEHSMS) व्यवस्थापन प्रणाली मार्फत होत नाही. तथापि, महापारेषण कंपनीने याविषयीचे (SEMS) एक स्पष्ट धोरण तयार केले आहे आणि डिसेंबर २००९ पर्यंत एक कालबध्द कार्यक्रम तयार करुन अशी व्यवस्थापन प्रणाली अंमलात आणण्याची निश्चित ग्वाही दिलेली आहे. कंपनीची सा.प.आ.सू.चे धोरण (SEMS) हे आय्एफसीच्या कार्यपालन प्रमाणकांशी सुसंगत आहे आणि यासाठी करावयाच्या व्यवस्थापन प्रणालीमध्ये (SEHSMS) आय्एफसी च्या प्रमाणकांच्या तरतुदींचा समावेश करणार आहे. ही व्यवस्थापन प्रणाली पुढील कार्यपध्दतींचा समाविष्ट करील.

(अ) धोके ओळखणे व त्यावर बचावात्मक उपाययोजना करणे (पर्यावरण प्रापक (Receptors) सामाजिक प्रापक आणि इतर संबंधित यांना होऊ शकणारे धोके) (ब) धोके टाळण्यासाठीची कृती (यामध्ये धोके निष्प्रभ करण्यासाठी पर्यायी उपयांचा समावेश आहे) (क) अनिष्ट परिणामांचे (आघातांचे) व्यवस्थापन करुन धोके कमी करणे, यासाठी जागतिक बॅंक गट/आय. एफ. सी.- इ. एस. एच. यांच्या मार्गदर्शनपर सूचनांमधील योग्य आंतरराष्ट्रीय उद्योग प्रथा (Good International Industry Practices GIIP) अंमलात आणणे, बाधित संबंधितांना पुरेशी भरपाई देणे, जाहिरपणे सल्ला देणे व माहिती देणे आणि गा-हाणी सोडविणे (ड) संनियंत्रण करणे, माहिती योग्य त्या स्तरांवर कळविणे, मूल्यांकन करणे, प्रतिक्रियांची नोंद घेणे, व्यवस्थापनाचा आढावा घेणे आणि सुधारणा करण्यासाठी कृती करणे तसेच (इ) जबाबदारी आणि संसाधने यांचे वाटप करणे यामध्ये सामाजिक व पर्यावरणाच्या धोक्याच्या व्यवस्थापनासाठी संघटनात्मक रचना उभारणे यांचाही समावेश आहे.

सध्या सा.प.व.आ.सु. विषयीची नियमानुसार पूर्तता करण्याची जबाबदारी परिमंडलाच्या प्रमुखांवर आहे. परिमंडल प्रकल्प आणि संचालन व सुव्यवस्था या दोन्ही बाबतची जबाबदारी त्यांच्यावरच आहे. प्रकल्पाची कामे बहूदा कंत्राटदारंकडून केली जातात. महापारेषण कंपनी ही कंत्राटे देतांना त्यांत कामगार कायद्याचे पालन, सुरक्षेच्या नियमांचे अनुसरण, आणि मार्गाची परवानगी मिळविणे इ.चे पालन कंत्राटदारांनी करण्याची तरतूद करते. यापूढे व्यवस्थापन प्रणालीमध्ये या तरतूदी अधिक शक्तीशाली करण्यात येतील त्यांत 'इ.पी.सी.“ किंवा कामाचे कंत्राटदार यांनी महापारेषणच्या सामाजिक व पर्यावरणाच्या धोरणांनुसार कंत्राटाची कामे केली पाहिजेत याची खातरजमा केली जाईल.

महापारेषण कंपनी यापुढे मुख्यालय आणि कार्य करणारी अन्य स्तर/कार्यालये (परिमंडल/मंडल/विभाग) येथे योग्य संघटनात्मक रचना असलेली सावप व्यवस्थापन प्रणालीची स्थापना करील. त्यात योग्य पात्रताधारक व्यक्तींची नेमणून करील यामुळे सा.प.आ.सु.चे धोरण सर्वत्र अंमलात येईल. याशिवाय कंपनी या धोरणाच्या अमलबजावणीची हमी मिळावी व त्याच्या प्रभावीपणात वाढ व्हावी यासाठी ठराविक मुदतीत तपासणी करील. यासाठी
(अ) पाहिल्या दोन वर्षात दर तीन महिन्यांनी त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करण्याची सक्ती राहील. त्यानंतर दर दोन वर्षांनी त्रयस्थ संस्थेकडून तपासणी केली जाईल. याशिवाय
(ब) दर तीन महिन्यांनी अंतर्गत तपासणी होईल.

महापारंषण कं. सध्या आपल्या प्रकल्पांचे व कार्याचे सामाजिक व पर्यावरीणीय परिणामांचे मूल्यमापन करीत नाही. मात्र व्यापक नियोजनाचा भाग म्हणून सामाजिक व पर्यावरणासंबंधीच्या बाजूंचा विचार केला जातो. व त्यातील महत्वाच्या प्रश्नांबाबत उपाय शोधले जातात. महापारेषण कंपनीच्या पारेषण

वाहिन्या टाकण्याच्या कामाचे नियोजन करतांनाचे निकष असे आहेत (अ) तारांची उभारणी करतांना आणि नंतर देखभाल करण्यांत सहज सुलभ तसेच पावसाळी आणि उन्हाळयाच्या मोसमांत देखभाल करणे सोपे आहे. (ब) तारमार्ग कमी खर्चाचा असावा व (अँगल पॉईन्ट) जोडणीचे सांधे कमी असावेत. (क) वन्य जीवांसाठी असलेली अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, राखीव वने, उंच वृक्षराजींची अरण्ये, पूराणवस्तू शास्त्रानुसार महत्वाची स्थळे, पूजनाच्या आणि अंत्यविधीच्या जागा, इ. टाळण्यात याव्यात. (ड) खाणी, संरक्षण विभागच्या आस्थापना, आणि इतर संवेदनशील क्षेत्र, उदा. विमानतळे आणि विमाने उतरण्याच्या जागा इ. टाळाव्यात. (इ) अति दाट लोकवस्तींची क्षेत्रे, मोठया वस्त्या, विस्तारणारी गांवे/खेडी आणि शहरे, नियोजन करुन विकसीत केलेली क्षेत्रे, विकासाठी वाव असलेल्या बिगर शेतीच्या जमिनी या टाळाव्यात (फ) सरळ उतार असलेली जमीन, जेथील माती अस्थीर असते अशा जमीनी, महापूर येणा-या तसेच जेथे दरड कोसळतांत अशा जागा, दलदलीची जमीन, नदीची पात्रे आणि खोल जमिनी या टाळाव्यात. (ग) बागा, रोपवाटिका, मळे, चहा, तंबाखू, केशर इ. यांची लागवड होणा-या जागा टाळाव्यात. (ह) रेल्वेमार्ग, नद्या, झरे, रस्ते, वीजतारा, संपर्क तारा यांच्या ओलांडण्याच्या जागा (क्रॉसिंग) कमीतकमी असाव्यात.

तारांचे मार्ग अनुकूल असावेत यासाठी महापारेषण कंपनी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर विसंबून असते. नकाशे, पायी जाऊन तपासणी करणे, जीपीएस् मार्कींग, उपग्रहाद्वारे घेतलेल्या प्रतिमांचा वापर करणे, क्षेत्रांची तपासणी करणे आणि तपशीलवार सर्वेक्षण करणे इ. पध्दतीने हे कार्य केले जाते. सामाजिक, पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्याचा एक भाग म्हणून महापारेषण कंपनी आपल्या कार्यामुळे उद्भवू शकणारे धोके आणि प्रभाव यांचे सखोल मूल्य मापन करणार आहे. याशिवाय सा व प व्यवस्थापन प्रणाली नुसार सामाजिक व पर्यावरण बाबतची प्रक्रीया आणि गरजा योग्य प्रकारे बळकट केल्या जातील. यामुळे या सा व प धोरणाशी सुसंगत अशी फलनिष्पत्ती होईल.

महापारेषण कं. सध्या भारतीय पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रणाच्या गरजा या पूर्ण करण्यासाठी कांही कार्यपध्दती अमलांत आणत आहेच, मात्र यापुढे महापारेषणाच्या सा.प.आ.सु. व्यवस्थापन प्रणालीमध्ये तिच्या कामाद्वारे मानवी आरोग्यावर आणि पर्यावरण यांच्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी किंवा ते कमीतकमी व्हावेत यासाठीच्या उपाय योजना समाविष्ट केल्या जातील. यामध्ये ज्यांच्या उत्सर्जनामुळे हवामानात बदल होते अशा पदाथांचे उत्सर्जन कमी करण्याच्या उपायांचा समावेश आहे. महापारेषण कंपनीने स्थापन केलेल्या यंत्रणेसाठी प्रामुख्याने वीज जाळयातील वीज वापरली जाते. मात्र राखीव वीज पूरवठयासाठी डिझेलवर वीज निर्मिती करणारे संच वापरले जातात. या डिझेल संचातून हवेत उत्सर्जन होते. यापुढे महापारेषण कंपनी या संचातून होणारे उत्सर्जन (जरी ते केवळ राखीव असले तरी) जागतीक बँक/आयएफसी यांच्या प्रमाणपध्दतीनुसार आहे याची दक्षता घेईल.

या प्रकल्पातून एस.पी.एफ., आर.पी.एम्. यासारखे सल्फर डाय ऑक्साईड SO2 किंवा नाट्रोजन ऑक्साईड NO2 यासारखे जमिनीच्या पातळीवर प्रदूषणाची तीव्रता वाढविणारे घटक किंवा प्रदूषक असणार नाहीत. तसेच ध्वनी प्रदूषणही वाढणार नाही. महापारेषण कं. या डिझेल संचावर यजमान देशाच्या नियमाप्रमाणे ध्वनी शोषक आवरण लावणार आहे. याचप्रमाणे भारत सरकारने मॉटीयल करारातील तरतुदीनुसार अंमलात आणलेल्या ओझेन पदार्थ रिक्त करण्याविषयीच्या नियमांचे पालन केले जाईल. यामध्ये स्वच्छतेसाठी वापरली जाणारी रसायने, वातानुकूल यंत्राणेसाठी वापरात आणलेले शीतकारक पदार्थ, आग विझवणारे वायू, इं. चा समावेश होतो.

महापारेषण कंपनीकडे शक्ती-परिवर्तक (पॉवर ट्रान्सफॉर्मर) आहेत. त्यामध्ये पॉली-क्लोरिनेटेड बायफेनील्स (PCBS) असते. मात्र असे सर्व पॉवर ट्रान्सफॅार्मर टप्प्याटप्प्याने काढून टाकण्यात येतील याची हमी कंपनीने दिली आहे.

महापारेषण कंपनी प्रकल्पांचे बांधकाम करतांना नजरचूकीने हवेत होणारे उत्सर्जन आणि त्रासदायक आवाज यांचे प्रमाण कमीतकमी ठेवण्यासाठी प्रयत्न करील. तसेच, बांधकाम, रचना आणि प्रत्यक्ष कार्यान्वयन करतांना प्रदूषण कमीतकमी करण्याच्या उपाय योजना कटाक्षाने अंमलात आणील असे आश्वासन कंपनीने दिले आहे.

महापारेषण कंपनीला आपल्या नित्य कामासाठी प्रक्रीया केलेल्या पाण्याची गरज नाही. केवळ मनोरा उभारणीच्या तात्पूरती आणि अल्प प्रमाणात मागणी केली जाते. पिण्याचे पाणी भारत सरकारने दिलेल्या प्रमाणकांनुसार पुरविले जाईल याची काळजी महापारेषण कंपनी घेईल. याशिवाय प्रक्रीया झलेल्या सांडपाण्याची निर्मिती होत नाही. उपकेंद्रात स्थानिक पातळीवर सांडपाण्याची निर्मिती होते त्याची विल्हेवाट सेप्टीक टँक आणि सोक पीट मार्गाने लावली जाते. मात्र बांधकामाच्या जागी असलेल्या श्रमीकांच्या छावण्यांमुळे आरोग्यास घातक प्रदूषकाची निर्मिती मोठया प्रमाणांत होते. यासाठी कंत्राटदारवर पुरेशी काळजी घेण्याचे सक्तीचे करण्यांत येईल. यापुढे असे प्रदूषक स्थानिक जमिनीवर किंवा पाण्याच्या जागी राहणार नाहीत याची खबरदारी कंपनी घेईल.

महापारेषण कंपनीच्या उपकेंद्राच्या परिसरात धोकादायक कचरा बाहेर पडतो. त्यांत ट्रान्सफॉर्मर ऑईल, वंगण तेल, पराविद्युत् (dielectric) असलेली साधने, बॅट-या, गास्केट, तेलाच्या गाळण्या व इतर देखभालीचा कचरा असतो. अशा धोकादायक वस्तू, पदार्थच्या कच-याची पध्दती सुधारणे गरजेचे आहे. कंपनी सध्या वापरलेले तेल आणि बॅट-या अधिकृत संस्थांकडे नष्ट करण्यासाठी देते. यापुढे कंपनीच्या संबंधीत क्षेत्रातील धोकादायक कच-याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रीया यजमान देशातील नियमांनुसार अधिकृत संस्थांमार्फतच केली जाईल याची दक्षता कंपनी घेईल. बांधकाम चालू कसतांना कंत्राटदारांनी ऑईल, वंगण यांची साठवण व हाताळणी, सांडल्या जाऊ शकणा-या

द्रव पदार्थांचे व्यवस्थापन याबाबत योग्य अशी कार्यपध्दती वापरात आणाव्यात अशा सूचना देण्यांत येतील. यामध्ये तात्पूरत्या स्वरुपाच्या साठवणीची सोय करण्याचाही अंतर्भाव आहे. याशिवाय कंपनी बांधकामाच्या काळात कमीतकमी दुष्परिणाम होतील याबद्दल योग्य ते उपाय योजण्याचा आग्रह कंत्राटदाराकडे धरील.

भू पृष्ठावरील मातीची हानी होऊ नये तसेच, पाण्याच्या जागी तरंग गाळ साचू नये यासाठी महापारेषण धूप नियंत्रण उपाय योजना करील. यामध्ये उतार स्थिर करणे (Rip/Rap) पावसाळयांत खननाची कामे बंद ठेवणे, खड्डयातील पाणी पाण्याच्या जागांकडे किंवा ओलसर जमिनीकडे वहात जाणार नाही याची काळजी घेणे, साठी करण्यसाठी वेगळी जमीन निवडणे आणि काम पूर्ण झल्यावर जमिनीवरची माती पून्हा पूर्वीसारखी पसरुन देणे आदिंचा समावेश आहे. उरलेले दगड आणि अन्य बांधकाम साहित्य पूर्वीच निवडलेल्या जागेवर ठेवले जाईल किंवा ते उताराचे स्थिरीकरण किंवा झ-यांचे कामासाठी वापरले जाईल.

महापारेषण कंपनी जे ब्रेकर्स वापरते त्यात SF-6 हा ग्रीन हाऊस वायू असतो. वैश्वीक तपमान वाढविण्याचे सामर्थ्य या वायूमध्ये मोठया प्रमाणांत आहे. यापुढे महापारेषण आपला SF-6 च्या प्रादूर्भावाला आळा घालण्याचा कार्यक्रम अधिक पक्का करील. यामध्ये SF-6 ची हानी/गळती वातावरणांत सोडण्याचे प्रमाण कमी करणे, SF-6 च्या पूनर्वापर व पुर्चक्रीकरण करणे आणि पूनर्वापर करता येणे शक्य नसल्यास SF-6 नाहीसा करणे आदि उपायांचा समावेश आहे.

तसेच, यापुढे GHG चे उत्सर्जन प्रणालीची कार्यक्षमता वाढल्याने टळणार आहे. कंपनी संकल्पित (सा.प.आ.सु) व्यवस्थापन प्रणालीमध्ये ऊर्जेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विविध उपाय अमलांत आणणार आहे. यामुळेही GHG चे उत्सर्जन कमी होईल. तसेच, GHG चे उत्सर्जनाची मोजणीही करण्यांत येईल.

महापारेषण कंपनीचे धोरण सर्व आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त प्रमाणकांना (Standards) अनुसरण्याचे आहे. (यांत भारतीय, ब्रिटीश, आय्इइइ आणि आय्इसी ही या सर्व प्रमाणकांचा समावेश आहे). संकल्प चित्र तयार करणे, सुविधांची उभारणी करणे, पारेषण वाहिन्या टाकणे, पायाभूत सुविधांना आधार देणे, आणि साधन सामग्रीची निवड करणे आदि कामे याच प्रमाणकांनुसार केली जातात. याशिवाय कंपनी वीजतारांचा मार्ग ठरवितांना दाट लोकवस्तीची क्षेत्रे टाळण्याचा प्रयत्न करते. तसेच वीजतारांच्या भोवती मोकळी जागा ठेवण्याचे प्रमाण भारतीय विद्युत् सनियमावलीतील प्रमाणकांनुसार केले जाते. यासाठी पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

(अ) कमी शक्तीच्या तारा जमिनीच्या वरुन नेण्यास मोकळीक आहे

(ब) इमारती पासून उभी मोकळीक लागते.

(क) इमारती पासून आडवी मोकळीक घ्यावी लागेल

(ड) एकमेकांना छेदणा-या तारांमध्ये कमीतकमी अंतर ठेवणे आणि

(इ) बाहेरच्या/उघडया वीज उपकेंद्रातील सचेतन (Live) साधनांसाठी कमीतकमी जागा वापरण्याची मोकळीक मिळते.

या संदर्भात असे आढळून आणि आहे की, ब-याच वेळा स्थानिक लोक/वस्त्या जेथे पारेषणाचे पायाभूत रचना उभारण्यात आली आहे तेथेच नंतर विहीरी खणतात. यासाठी महापारेषण कंपनी जेथे कामासाठी सोयीची रचना उभारली आहे. त्या जागेच्या २०० मिटर पर्यंतच्या लोकवस्तीत पुढील कार्यक्रम राबविल (अ) तेथे जन जागृतीचा कार्यक्रम करणे (ब) जनसमुदायाकडून आणिबाणीच्या वेळा प्रतिसाद देणारी योजना विकसीत करणे (क) या जन समुहाच्या प्रतिसादाच्या योजनेची सांगड जिल्हा आणि राज्य प्रतिसादर यंत्रणेशी घालणे (ड) कामाच्या जागेवर आणि इतरत्र प्रशिक्षणाचा कार्यक्रम वारंवार घेणे, लुटूपुटूचा सराव करणे आणि त्यात स्थानिक जनतेचा सहभाग करुन घेणे. महापारेषण कंपनी प्रकल्पांचे कंत्राटदार/EPC यांचेकडून सामाजिक, पर्यावरणीय आरोग्य आणि सुरक्षा याबाबतच्या चांगल्या कार्यपध्दतीचा अवलंब केला जाईल याबद्दल आग्रह धरील. तसेच, कंपनी आपले कर्मचारी तसेच कंत्राटदाराची यंत्रे चालविणारे यंत्रचालक आणि वाहन चालकांना सुरक्षित वाहन व यंत्रे चालविण्याचे प्रशिक्षण देईल. सामग्री हलविण्याची योजना तयार करील, जेणेकरुन स्थानिक जनतेच्या नेहमीच्या जीवनपध्दतीवर फारसा परिणाम होणार नाही. खाणकामातून वर काढलेली माती व इतर बांधकाम साहित्य राखून ठेवतांना त्यातून उत्सर्जन होणार नाही याची दक्षता घेण्यांत येईल. रात्रीच्या वेळेचे कामावर निर्बंध आणेल व कमी गोंगाट होईल याची काळजी घेईल. ठराविक मुदतीवर गोंगाटाच्या तीव्रतेचे संनियंत्रण करील व तेथील गांवे, वस्ती यांना त्याची बाधा होऊ देणार नाही आणि होत असल्यास ती शमन करण्याचे उपाय योजील.

जेव्हा प्रकल्पाच्या उभारणीसाठी मोठया प्रमाणात कामगारांचा लोंढा अपेक्षित असेल तेव्हा त्यांना सर्व योग्य त्या सुविधा कंत्राटदाराने पुरविल्या आहेत याबद्दल कंपनी खात्री करेल. यासंदर्भात कंपनी शक्यतो स्थानिक लोकांनाच बांधकाम मजूर म्हणून सहभागी करावे याचा कंत्राटदाराकडे आग्रह धरेल. श्रमिकांच्या छावणीत घरे, स्वच्छतागृहे, धुणे व स्वच्छतेसाठी पुरेसा पाणी पुरवठा, तसेच पिण्याचे पाणी, स्वयंपाकासाठी इंधन, पुरविणे, सांडपाणी मल निःसारण यासाठी आय्एफसी/जागतिक बँकेने निश्चित केलेल्या आवश्यकते नुसार झाल्या पाहिजेत व सांडपाण्याचा निचरा बाहेर सोडण्यापूर्वी व्हायला हवा याची खातरजमा करण्यात येईल. स्थानिक लोकांच्या जीवनावर बाहेरुन आलेल्या कामगारांच्या लोंढ्यांचे कोणकोणते परिणाम होऊ शकतील याचे नेमके अंदाज घेण्यात येतील व अशा परिणामांचे व्यवस्थापन करण्यात येईल.

महापारेषण प्रकल्पामुळे, प्रकल्पांच्या परिसरातील जमीन, पाणी, हवा यामध्ये मोठया प्रमाणात बदल होणे अपेक्षित नाही. अशा बदलांमुळे तेथिल जनतेमध्ये कांही आजार पसरणे व तेथे कटूता निर्माण होणे हे असे प्रकार टाळण्यासाठी, मोठी वीज उपकेंद्रे उभारतांना तेथील नैसर्गिक जल निःसारणाच्या पध्दतीत कमीतकमी व्यत्यय येईल याची काळजी कंपनी घेईल. यासाठी आवश्यकता असल्यास नाले तयार करणे, वादळाने साचलेले पाणी वळविण्यासाठी मार्ग खोदणे असे उपायसुध्दा कंपनी योजेल.

तसेच, बाहेरच्या कामगारांचा लोंढा मोठया प्रमाणात आल्यास त्यामुळे स्थानिक जनतेमध्ये कोणत्याही आजाराची लागण होऊ नये यासाठी खबरदारी घेण्याचा आग्रह प्रकल्प कंत्राटदाराकडे धरण्यात येईल.

महापारेषण कंपनीच्या नोकरीत सशस्त्र सुरक्षा कर्मचारी आहेत. याशिवाय सुरक्षा सेवा पुरविणा-या नामवंत संस्थांकडून सुरक्षा रक्षक घेतले जातात. सुरक्षा कर्मचा-यांच्या संबंधी आय्‌एफसीच्या कार्यपालन मानक क्र.४ यातील तरतुदींचा आढावा कंपनी घेईल. आणि सुरक्षेची कार्यपध्दती अद्ययावत करेल. त्यात पुढील बाबींचा समावेश असल्याबद्दल खात्री केली जाईल.

सुरक्षा कर्मचा-यांचे पूर्वीचे अहवाल तपासणे, सुरक्षा कर्मचा-यांना सुस्पष्ट उद्दीष्ट देणे व त्यांना कोणत्या कृती करण्याची परवानगी आहे याबद्दल माहिती देणे, त्यांच्याकडून मानवी हक्कंची पयमल्ली होऊ नये यासाठी प्रशिक्षण देणे, हत्यारे, दारुगोळा कसा वापरावा व वेगवेगळ्या परिस्थिती हाताळण्याच्या सुस्पष्ट पध्दती शिकवणे, सुरक्षा विषयक घटनांची नोंद ठेवणे, त्याची चौकशी करणे व सुधारणांसाठी केलेली कारवाई इ. नोंदणे, सुरक्षा कर्मचा-यांबाबत आलेल्या ख-याखु-या तक्रारींची चौकशी करणे/शिस्तभंगाच्या कारवाईची अंमल बजावणी करणे. तसेच, सुरक्षा कर्मचा-यांकडून त्यांच्यासाठी असलेल्या आचारसंहितेचा भंग झाल्याबद्दल अन्य स्थानिक रहिवाशी किंवा कर्मचारी यांच्या तक्रारी असल्यास त्या सोडविण्याची यंत्रणा अस्तित्वात असणे.

महापारेषण कंपनी वीज उपकेंद्रांच्या उभारणीसाठी बहूदा शासकीय जमिनी संपादन करण्यास अधिक पसंती देणे. पारेषण तामार्ग उभारणे, त्या कार्यान्वित करणे व त्यांची देखभाल करणे.

याकामासाठी तेथे नेहमी जाण्याकरीता मार्गाचा अधिकार (Right of Way Row) मिळविला जातो. पारेषण वाहिन्यांच्या क्षमतेनुसार पुढीलप्रमाणे रुंदीच्या पट्टयांचे मार्गाचे अधिकार मिळविले जातात ते असे

| पारेषण क्षमता | रुंदी |
|---|---|
| ६६ केव्ही | १८ मिटर्स |
| १३२ केव्ही | २७ मिटर्स |
| २२० केव्ही | ३५ मिटर्स |
| ४०० केव्ही | ५२ मिटर्स |

असे मार्गाधिकार संपादन केलेल्या जागेची मालकी जरी जमीन मालकाकडे रहात असली त्याला त्या जमिनीवरील पुढील हक्क सोडावे लागतात. ते असे :-

अ) मार्गाधिकार दिलेल्या जागेवर कोठेही पक्के बांधकाम करणे
ब) मार्गाधिकारी दिलेल्या जागेत उंच वाढणारी झाडे लावणे किंवा तेथे कुठलीही लागवड करणे तसेच
क) वीज तारांच्या मनो-याच्या पायाच्या जागेचा जमीन मालकार पूर्वीप्रमाणे वापर करण्यापासून परावृत्त होणे.

जर मार्गाधिकाराची जमीन शेतीची असेल तर जमीन मालकांस पारेषण वाहिन्या उभारल्यानंतर तेथे पूनः शेती करता येणे शक्य होते. मात्र जर मार्गाधिकार दिलेली जमीन झाडांच्या लागवडीसाठी वापरली जात असेल तर जमीन मालकांस अशा जागेत झाडांची लागवड चालू ठेवण्याचा हक्क गमवावा लागतो. महापारेषण कं. मार्गाधिकार मिळवितांना भारतातील टेलीग्राफ कायदा आणि विद्युत् कायदा यामध्ये दिलेल्या तरतुदीनुसारच कृती करते. या कायद्यांमध्ये झाडे आणि पिके यांच्या हानीबद्दल भरपाई देण्याची तरतूद आहे. बांधकाम करतांना (आणि देखभाल करतांना) झालेल्या पिकांच्या नुकसान भरपाईची रक्कम महाराष्ट्र शासनाचा फलोत्पादन विभाग करते. इमारती, लाकडांची झाडे, फळे देणारी व फळे न देणारी इतर झाडे यांची नुकसान भरपाई महाराष्ट्र शासनाच्या वन विभागातर्फे निश्चित केली जाते. पिकांच्या भरपाईचे मूल्य (अ) पिकांचे उत्पादन आणि (ब) सदर उत्पादनाला कृषी उत्पन्न बाजार समिती आयोजि घाऊक बाजारातील अलीकडचा बाजारभाव यांच्या आधारे निश्चित केली जाते.

कंपनी, मार्गाधिकारी दिलेल्या क्षेत्रातील फळे देणारी झाडे पाडल्यास त्याची भरपाई निश्चित करण्यासाठी फलोत्पादन विभागाच्या सल्ल्यानुसार एक 'आकृतीबंध" तयार करेल. त्या भागातील प्रत्येक जातीच्या झाडांना हा आकृतीबंध लागू राहील. तो खालील बाबींवर आधारीत आहे.
(अ) पाडलेल्या झाडाच्या उत्पादन क्षमतेचे उरलेले आयुष्य
(ब) झाडाच्या उरलेल्या आयुष्यातील अपेक्षित फळांचे उत्पादन
(क) सध्या संधटीत घाऊक बाजारातील अलीकडच्या प्रचलीत भावानुसार मिळू शकणारा दर
(ड) झाडाच्या उत्पादनक्षम आयुष्यात मिळू शकणारे लाकूड

(इ)  या लाकडाला मिळणारी किंमत
(फ)  झाड मालकाने केलेला खर्च (ही रक्कम भरपाईमधून वजा करावी)

ज्या झाडांपासून फक्त लाकडाचे उत्पादन मिळते, तेथे शेतक-याला पाडलेल्या झाडाचे लाकूड घेता येईल तसेच, वनविभागाने सदर झडाची उंची आणि रुंदी या आधारे निश्चित केलेली भरपाई सुध्दा मिळेल.

पीक आणि झाडे यांच्या हानीचे मूल्यमापन करण्यासाठी महापारेषणाने पथक तसेच जमीन मालक, दोन पंच (ग्राम स्वराज्य संस्था – पंचायतीचे दोन प्रतिनिधी), जमीन नोंदणी/महसूल अधिकारी तपशीलवार पंचनामा कागदोपत्री तयार करतील.  यामध्ये हानी झालेल्या झडाचे/पिकाचे स्वरुप, हानीची व्याप्ती (पिकांचा प्रकार, फळधारी झाडांचा तपशील, फळे व पिके यांची प्रचलीत किंमत ) इ. बाबी असतील.  पंचनामा सर्वांच्या साक्षीने व सह्याने तयार केला जाईल.  जर एखाद्या जमिनीची मालकी संयुक्तपणे अनेक व्यक्तींच्या नावावर असेल तर त्यापैकी अनुपस्थित असलेल्या संयुक्त मालकांकडून 'ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मिळवावे लागेल.  भरपाई सर्व संयुक्त मालकांच्या नांवे काढलेल्या चेकने देण्यांत येईल.

अनैच्छिक पूनर्वसन कमीतकमी व्हावे असाच कंपनीचा प्रयत्न असतो.  सामाजिक, पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा व्यवस्थापन प्रणालीचा एक भाग म्हणून महापारेषण कं. एक अधिकार सूत्र (Entitlement Matrix) तयार करेल.  या सूत्रामुळे भू संपादन करणे किंवा प्रकल्पग्रस्त जमीन वापराच्या हक्कावरील मर्यादा, यांच्यामुळे होणारे सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम कमीतकमी होतील. (प्रकल्पग्रस्तांमध्ये अनौपचारिक वस्ती करणा-यांचा जमीन वापर समाविष्ट आहे).  या सूत्रामध्ये पुढील बाबी आहेत.

१)  मालमत्तेच्या हानीबद्दल पूनर्वसनाच्या खर्चासह भरपाई देणे.
२)  पूनर्वसनाची कार्यवाही योग्यप्रकारे माहिती जाहीर करुन तसेच सल्लामसलत आणि बाधीत जनसमुहांच्या सहभाग घेऊन होईल याची खात्री करुन घेणे
३)  विस्थापित व्यक्तीचे जीवनमान सुधारले पाहिजे, किमानपक्षी ते पूर्वीसारखे राहिले पाहिजे आणि
४)  विस्थापित व्यक्तींची जीवनपध्दती सुधारण्यासाठी त्यांना पूनर्वसनाच्या जागेवर घराची व्यवस्था अधिकाराच्या हमीसह दिली पाहिजे.

महापारेषण कंपनी आपल्या प्रकल्पांमुळे जैविक विविधतेवर होऊ शकणारे दुष्परिणाम किमान राहतील यासाठी प्रयत्नशील असते.  पारेषण वाहिन्या टाकतांना खालील क्षेत्रे टाळली जातात.

अ)  वन्य जीवांसाठी असलेली अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, राखीव वने, बागा, रोपवाटिका, उंचवृक्षांची क्षेत्रे आणि लागवडीची क्षेत्रे तसेच,

ब)  नद्या, झरे, कालवे यांच्यारुन वाहिन्या नेण्याचे (crossing) प्रमाण कमीतकमी ठेवणे.  कंपनी सा.व.प.आ.सु.व्य. प्रणालीचा एक भाग म्हणून जैविक विविधता (Bio-Diversity) जपणे आणि तिचे रक्षण करणे कार्यपध्दती विकसीत करेल.  यामध्ये नैसर्गिक व गंभीर स्थिती असलेल्या मूळ स्थानांचा नाश करणे किंवा ती कमी करणे टाळले जाईल.  तसेच ज्या समुहांचे जीवन नैसर्गिक स्त्रोतांवर अवलंबून आहे.  त्यांना ते स्त्रोत सहजपणे उपलब्ध राहतील याची काळजी घेतली जाईल. याशिवाय कंपनी नद्या, झरे, तलाव, जेथे पाण्यावरील जैविक सृष्टी अस्तित्वात आहे अशा पाणथळ जागा, जलचर आणि जलवनस्पती असणारे किना-यालगतचे प्रदेश अशा सर्व जागा पारेषण तारमार्ग टाकल्यामुळे होणा-या परिणामांचे प्रमाण कमी ठेवण्यासाठी उपाय योजना करण्यात येईल.  तसेच, पैदाशीच्या जागी पाईप टाकणे, जंगल व आरक्षित विभाग, संवेदनशील क्षेत्राच्या परिसरात स्फोट घडविणे आदि कृत्ये सुध्दा टाळली जातील.  कंपनी प्रकल्पासाठी पाडलेल्या प्रत्येक झाडाबद्दल दोन नवीन झाडे लावेल.  सामाजिक वनीकरणाच्या कार्यक्रमांतर्गत हे काम केले जाईल आणि त्यासाठी स्थानिक लोक, नागरी सामाजिक संघटना आणि वन विभाग यांना सहभागी केले जाईल.  तसेच, स्थानिक वनविभागाच्या सल्ल्यानुसार व लागू केलेल्या कायदेशीर व नियामक गरजांनुसार सक्तीचे वनीकरण करण्याचे कार्य केले जाईल.

महापारेषणाच्या प्रकल्पामुळे ज्या जमिनीवर किंवा स्त्रोतांवर मूळ निवासी आदिवासी लोक अवलंबून आहेत ते स्त्रोत बदलणे, कमी होणे किंवा त्यावर दुष्परिणाम होणे अपेक्षित नाही.  तरीही सामाजिक व पर्यावरणीय व्यवस्थापन प्रणालीचा एक भाग म्हणून अशा मूळ निवासी लोकांवर कंपनीच्या कामाचा कोणताही अनिष्ट परिणाम होणार नाही किंवा होणार असल्यास त्याचे प्रमाण अत्यल्प असेल यासाठी उपाय योजिले जातील, तसेच, त्याची भरपाई केली जाईल.  आदिवासींच्या विकासाच्या लाभाच्या संधी योग्य प्रकारे व सुसंस्कृरित्या मिळाव्यात यासाठी कंपनी जे उपाय योजिल ते असेः-

१)  आदिवासी आणि नैसर्गिक स्त्रोतांवर अवलंबून असलेल्या मूळवासी जनतेचा आदर, सन्मान त्यांचे मानवी हक्क व आकांक्षा, संस्कृती यांची, विकासाच्या प्रक्रीयेत वाढ होण्याबद्दल काळजी घेणे
२)  कंपनीच्या प्रकल्पामुळे बाधित झलेल्या मूळ व आदिवासी जनांबरोबर चांगले संबंध जोडणे व ते सातत्याने टिकविणे.
३)  कंपनीचा प्रकल्प आदिवासी जनांच्या पारंपारिक किंवा प्रथेच्या/चालीरीतीच्या जागेवर होणार असल्यास सौजन्याने हितगूज करुन, आणि त्यांना माहिती देऊन, त्यांना सहभागी करुन घेणे.
४)  आदिवासींची संस्कृती, ज्ञान व प्रथा याबद्दल आदर बाळगणे व ते टिकविणे.

कंपनीच्या कामाच्या पध्दतीमध्येत वाहिन्या टाकतांना संस्मरणीय स्थाने, पूरातत्वशास्त्राच्या दृष्टीने महत्वाच्या रचना, धार्मिक आणि अंत्यसंस्काराची स्थळे असलेल्या जागा टाळण्याची तरतूद आहे. सा.व.प. व्यवस्थापन प्रणालीचा भाग म्हणून कंपनी आपल्या कामाचे सांस्कृतीक स्त्रोतांवर कमीतकमी परिणाम होतील याची काळजी घेईल. त्यात पुरातत्वशास्त्राच्या दृष्टीने महत्वाच्या (इतिहासपूर्व) सापडलेल्या जागा, अष्मयुगाच्या अभ्यासाच्या जागा, ऐतिहासिक, सांस्कृतिक, कला, व धार्मिक दृष्ट्या महत्वाची स्थळे, तसेच, नैसर्गिक पर्यावरणाचे आगळेवेगळे स्वरुप दर्शविणा-या जागा उदा. पवित्र राई/वृक्षराजी इ. यांचाही समावेश करण्यात येईल.

## PS2कार्यपालन प्रमाणक क्र.२: कामकार आणि कामाचे वातावरण/स्थिती इ.

महापारेषण कं.मध्ये १०,०३८ कर्मचारी आहेत (दि.३१ मे २००८ रोजी) याशिवाय कंपनीच्या प्रकल्पात मोठया संख्येने कंत्राटी कामगार आहेत. कंपनी सध्या कर्मचारी आणि त्यांच्या कामाचे वातावरण/स्थिती याचे व्यवस्थापन म.रा.वि.मंडळाच्या कर्मचारी सेवा नियमावलीनुसार (service rules) करीत आहे व पुढेही करीत राहील. असे असले तरी कंपनीचे आपले स्वतःचे मानव संसाधन धोरण आणि नियम पुस्तिका (Manual) तयार करण्याची प्रक्रीया सुरु झाली आहे. मानव संसाधन धोरण व नियम पुस्तिका प्रामुख्याने सेवा शर्तींवर आधारीत राहील. कंपनी आय्‌एफ्‌सी च्या 'कार्यपालन मानक-२" यांचा अभ्यास करुन त्यातील तरतुदी आपल्या मा.सं.धोरण आणि नियम पुस्तिकेत समाविष्ट करेल. सर्विस रुल्स मध्ये पुढील बाबींच्या कार्यपध्दतीचा समावेश आहेः-

कर्मच-यांच्या श्रेणींची रचना, भरती, कार्यपालनाचे व्यवस्थापन, वेतनवाढ आणि पदान्नती, कर्मचारी कल्याण, नोकरीच्या अटी यामध्ये कामाचे तास, पाळ्या, वेतन आणि अन्य फायदे पात्र रजा आणि सुट्या गा-हाणी दू करणे, वर्तणूकीची मानके, गैरवर्तणूक व शिस्त विषयक कार्यपध्दती – मराविमं कर्मचारी सेवानियम सामान्यतः 'कार्यपालन प्रमाणक २" (PS2) यांच्याशी सुसंगत आहेत. हे सेवानियम जाहीररित्या स्थानिक भाषेत (इंटरनेटवर सुध्दा) उपलब्ध आहेत. त्यातील बदल आणि ते अद्ययावत केल्याची माहिती ज्या परिपत्रकांत आहे, ती सूचना फलकांवर वेळोवेळी लावण्यात येतात. तसेच, ही माहिती इंटरनेट/इंट्रानेट यावरही सर्व कर्मचा-यांना लगेच पाहता येते. कंपनीच्या सर्व कर्मचा-यांना कामगार संघटनांमध्ये सामील होता येते.

कंपनी आपल्या कंत्राटदारांना कामगार संबंधी असलेल्या कायद्यानुसारच कामे पार पाडल्याचा आग्रह धरत असते. मात्र या संदर्भात कंत्राटदारांकडून त्यांनी 'कामगार कायद्याचे पालन केले आहे" याबद्दल अभिवचन घेण्याबाबतची कार्यपध्दती अधिक प्रभावी प परिणामकारक करण्याची गरज आहे. यानुसार कंपनीने आपल्या 'मानव संसाधन संबंधीच्या पुस्तिकेत तरतूद केली आहे. यापुढे

कंत्राटदारांकडून त्याने कामे पार पाडतांना कामगार विषयक सर्व कायद्यांचे पालन केले आहे‘‘ असे अभिवचन मिळविण्याच्या कार्यपध्दतीत सुधारणा केली जाईल.

महापारेषण कंपनीने ‘प्रकल्पाचे संकल्प चित्र‘‘ तयार करण्याची पध्दती तसेच कार्य आणि देखभाल करण्याची कार्यपध्दती यामध्ये ‘व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा‘‘ या विषयाचाही अंतर्भाव केला आहे. यानुसार तेथे ‘कामाचा परवाना‘ घेण्याची पध्दत आहे.
मात्र सुरक्षेच्या विषयी असलेल्या योग्य प्रमाणकांनुसार (प्रकल्पाच्या जागेवरील तसेच नित्य कार्य आणि देखभाल करणारे कर्मचारी आणि कंत्राटी कामगार या दोघांसाठी असलेल्या) अंमलबजावणी करण्यासाठी अधिक सुधारणा करण्याची गरज आहे. ‘योग्य आंतरराष्ट्रीय उद्योग‘‘ पध्दती (Good International Industry Practice GIIP) या मार्गदर्शनपर सूचनांमध्ये सुरक्षेबाबत तपशीलवार माहिती दिली आहे. त्या अमलात आणणे आवश्यक आहे. तसेच कंपनीचे कर्मचारी आणि कंत्राटी कामगार या दोघांना ‘व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा‘ या विषयावर प्रशिक्षण द्यावे लागेल.

पकल्पाच्या जागेवर घडलेल्या सुरक्षा विषयीच्या घटनांची माहिती संबंधितांना कळविणे, अशा घटनांची चौकशी करणे व तेथे सुधारणात्मक कृती करणे याबाबत कार्यपध्दती अधिक परिणामकारक केली पाहिजे. प्रकल्पाच्या जागेवरील कंत्राटी कामगारांसाठीही ही सूचना लागू आहे.

सामाजिक, पर्यावरणीय, आरोग्य आणि सुरक्षा यांच्या व्यवस्थापन प्रणालीत वर उल्लेखलेल्या ‘योग्य आंतरराष्ट्रीय उद्योग पध्दती‘ यामध्ये दिलेल्या तपशील महापारेषण कंपनी आणणार आहे. तसेच व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा यांचे सातत्याने व्यवस्थापन करणार आहे.

कंपनीची जनसमूहाशी संपर्क

लोकांशी सल्लामसलत करणे, माहिती जाहीर करणे आणि गा-हाणी सोडविणे:

महापारेषण कंपनी मार्गाधिकार संपादन करण्याची प्रक्रीयानुसार वीज तारा टाकण्याच्या कामाबद्दल वृत्तपत्रांतून जाहिराती देऊन माहिती देते. तसेच ज्यांची जमीन वीज मनो-याच्या उभारणीसाठी वापरणार अशांना घरी सूचना पाहिजे. कंपनी त्यानंतर सक्षम प्राधिका-यांसह बाधितांनी नोंदवलेली चिंता/गा-हाणी/विरोध स्विकारते, त्यावर योग्य तो निर्णय घेते तसेच, कांही अर्ज सकारण नाकारायचे असल्यास तसा निर्णय घेते. कंपनीचे अधिकारीसुध्दा वीजतारांच्या संकलित जागेवरील बाधित कमींना व त्यांचे गावातील प्रतिनिधींना भेटून माहिती देते. यासंबंधी प्रत्येक बाधित व्यक्तीशी संपर्क साधून पंचनामा तयार केला जातो.

तथापि, सदर जनसमुहाच्या संपर्काची कार्यपध्दती अधिक बळकट करण्याची गरज आहे. विशेषतः संपूर्ण लोकसमुहाला वाटणारी चिंता आणि त्यांच्या अपेक्षा प्रकल्पाचं कार्यचक्रासाठी मिळविल्या पाहिजेत. आणि या चिंता व अपेक्षांबद्दल प्रकल्पाच्या संकल्पचित्रात उत्तर असले पाहिजे. याप्रमाणे महापारेषण या विषयीच्या व्यवस्थापन प्रश्नाबाबत बाधित लोकसमूहाच्या संपर्काबद्दल पुढीलप्रमाणे कार्यवाही करेल.

अ) संबंधित माहिती वेळेवर आणि सांस्कृतिकदृष्ट्या योग्य पध्दतीने जाहीर करणे.

ब) बाधित लोकसमूहाशी प्रभावी व सतत सल्ला मसलत करणे

क) गा-हाणी निवारण करण्याची यंत्रणा अंमलात आणणे.

## प्रकल्पाच्या कागदपत्रांविषयी स्थानिक संपर्क

महापारेषणाची सामाजिक व पर्यावरण धोरण आणि आय्एफसी कार्यपालनांच्या मानकांना महापारेषण कंपनी करणारी उपाय योजना याची माहिती महापारेषण कंपनीची वेबसाईट www.mahatransco.in यावर जाहीर करण्यांत आली आहे. तसेच, ती कंपनीच्या विभागीय कार्यालयातही उपलब्ध आहे. याशिवाय महापारेषणच्या सामाजिक, पर्यावरण, आरोग्य, सुरक्षा व्यवस्थापन प्रणालीला अंतीम रुप दिल्यावर ती सुध्दा संपूर्ण रित्या वेबसाईटवर उपलब्ध राहील.

प्रकल्पाची चौकशी आणि अभिप्राय खालील पत्त्यावर पाठविण्याची विनंती आहे.

श्री.वासुदेव रा.अस्वार, संचालक (प्रकल्प)
'प्रकाशगंगा', आठवा माळा, भूखंड क्र.सी-१९,
४ ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

फोन क्रमांकः ९१-२२-२६५९५२५७
फॅक्स क्रमांकः ९१-२२-२६५९८५८७
वेब साईटः www.mahatransco.in